**सकाळी ११.३० पासून ते दुपारी ३.१५ पर्यंत साक्षीदार हजर. आरोपी व आरोपीच्या वकीलांचा अनेक वेळा पुकारा केला असता, आरोपी व आरोपीचे वकील गैरहजर असल्यामुळे कलम ३०९ फौ.प्र.सं. प्रमाणे आरोपी व आरोपीचे वकील यांचा अनुपस्थितीत साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात येतो.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – गुरुनाथ भाऊ घाडी

माझे वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा.ने. – नारिंग्रे जोगवलवाडी, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत</u>**

०१. दि. २९/०९/२०२३ रोजी माझे सासरे बाबुराव घाडी यांच्या घरी म्हाळ कार्यक्रम असल्याने त्या कार्यक्रमा साठी मी व माझा मुलगा राहूल गुरुनाथ घाडी हिरो कंपनीच्या इंग्नायटर मोटरसायकल क्र. एमएच–०७–वाय–१६२८ ने नारिंग्रे येथून कुडोपी येथे आलो होतो. म्हाळाचा कार्यक्रम झाल्यानंतर मी कुडोपी येथून नारिंग्रे येथे माझ्या घरी जाण्यासाठी निघालो होतो. सदर वेळी माझा मुलगा राहूल माझ्यासोबत होता. दुपारी २.४५ वा. कुडोपी मधलीवाडी व खालचीवाडीच्या मध्ये गणपती मंदिराजवळ आचऱ्याकडून बुधवळ्याकडे राजेश दशरथ वाळवे जात होता, त्याने माझ्या मोटरसायकलला धडक दिली. धडक दिल्यामुळे मला व माझ्या मुलाला दुखापत झाली होती. अपघातामध्ये माझ्या मुलाच्या डाव्या बाजूच्या चेहऱ्याला व डाव्या खांदयाला दुखापत झाली होती. तेथून आम्हाला कणकवली येथे पाकळे हॉस्पीटल येथे नेले. दुसऱ्या दिवशी पोलीस तेथे आले व पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. मला आता फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र. पी१/पीडब्ल्यू१</u>** दिली आहे. मला ठोस देणारा मोटरसायकलस्वार दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो. आजरोजी सदरचा मोटरसायकलस्वार न्यायालयात हजर नाही.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. एच.एल. गोवेकर यांचे मार्फत</u>**

आरोपी व आरोपीचे वकील उलट तपासासाठी गैरहजर असल्याने आरोपीविरुध्द विना उलट तपासाचा आदेश पारीत करण्यात येतो.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
दिनांक : ०२/०९/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

**सकाळी ११.३० पासून ते दुपारी ३.३० पर्यंत साक्षीदार हजर. आरोपी व आरोपीच्या वकीलांचा अनेक वेळा पुकारा केला असता, आरोपी व आरोपीचे वकील गैरहजर असल्यामुळे कलम ३०९ फौ.प्र.सं. प्रमाणे आरोपी व आरोपीचे वकील यांचा अनुपस्थितीत साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात येतो.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – श्रेयश विठ्ठल घाडी

माझे वय – २५ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा.ने. – नारिंग्रे जोगवलवाडी, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत**

०१. दि. ०२/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला चिंदर बुधवळे येथे बोलविले होते. पोलीसानी सदर ठिकाणी अपघात झाल्यामुळे पंचनामा करावयाचा आहे असे सांगितले होते. पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करुन नकाशा व फोटो काढले. पंचनामा हा चिंदर बुधवळा रस्त्यावरती केला होता. पंचनाम्याच्या वेळेस अपघातातील गाडया रस्त्याच्या बाजूला ठेवलेल्या होत्या. एक गाडी डिस्कव्हर कंपनीची होती व दुसरी इंग्रेटर कंपनीची होती. इंग्रेटर गाडीचा क्रमांक एमएच–०७–वाय–१६२८ असा होता. डिस्कव्हर गाडीचा क्रमांक एमएच–०४–जीएल–५५७२ असा होता. पंचनामा माझ्या समक्ष करुन त्यावर माझी सही घेतली होती. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी अ.क्र. १ ला सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी२/पीडब्ल्यू२** दिली आहे. मला आत एकूण ८ फोटो दाखविण्यात आले. सदरचे फोटो घटनास्थळाचे आहेत.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. एच.एल. गोवेकर यांचे मार्फत**

आरोपी व आरोपीचे वकील उलट तपासासाठी गैरहजर असल्याने आरोपीविरुध्द विना उलट तपासाचा आदेश पारीत करण्यात येतो.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण

दिनांक : ०२/०९/२०२४